# काव्य कुसुमोद्यान.

## प्रथम गुच्छ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.
काव्य
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
वा. नं.
REFBK-0001572
REFBK-0001572

# काव्य कुसुमोद्यान.

## प्रथम गुच्छ.

मालाकार

रा. रा. विश्वनाथ नारायण वाड.

मुद्रक

रा. रा. लक्ष्मण रामचंद्र करमरकर.

"श्री-समर्थ" छापखाना नासिक.

९५६?

REFBK-0001572
REFBK-0001572

प्रती २०

सन १९१८.

किमत ३ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

श्री जगदंब प्रसन्न



## समर्पण.

वाड कुलोद्दीपक जो नारायणराव मत्पिता त्याला ।
अर्पिन काव्यसुमन हें तदनंतर परम रसिक दात्याला ॥
**रावबहादुर** पदवी तेवी जनकार्य जो स्वयें साधी ।
ऐसा पूज्य पिता मम सकलांनां विदित राहणी साधी ॥
कर्तव्य सुपुत्राचें स्मरुनि तया आज वाहिली माला ।
जगदंबे रसिकांच्या दाखवि मज शुद्ध गाढ प्रेमाला ॥

* * *

* *

# रसिकांस.

श्री जगदंब कृपेनें माझ्या ' **काव्य कुसुमोद्यानांतील** ' प्रथमगुच्छ महाराष्ट्र भाषाभिमानीं रसिकांनां अत्यंत प्रेमपूर्वक नजर करण्यांत येत आहे. त्यांतील सुगंधानें प्रिय वाचकांचें घ्राणतर्पण होवों अशी मी इच्छा करितों. युद्धजन्य परिस्थितीनें पुस्तक प्रकाशनाचे मार्गांत कशा अडचणीं येत आहेत हें सर्वश्रुत आहेच. त्यामुळें नाइलाज म्हणून ह्या अल्प कृतीचें व्यावहारिक मूल्य तीन आणे ठेवावें लागलें आहे. वास्तविक माझी इच्छा खर्चापुरती रक्कम वसूल होई इतकीच आकारणी करावयाची, त्यापासून नफा कधींही मिळवावयाचा नाहीं. असो; माझे प्रेमळ हितचिंतक

मित्र रा. रा. **अनंत रघुनाथ घैसास** आणि रा. रा **आर. बी. थोरात** सेक्रेटरी मराठा बोर्डिंग नासिक. ह्यांचें मला जें बिनमोल साह्य झालें त्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझ्या शक्तीबाहेर आहे. तसेंच माझे कविमित्र '**मोरेश्वर**' सब् पोस्टमास्तर पिंपळगांव ह्यांनीं माझ्या कांहीं कविता वाचून जो माझा गौरव केला त्याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणीं राहीन. शेंवटीं 'श्री समर्थ' छापखान्याचे मालक रा. रा. **करमरकर** यांच्या साह्यानेंच माझ्या दृढ इच्छेनुरूप प्रस्तुत पुस्तक नासिक येथेंच निघूं शकलें ह्याबद्दल त्यांचे आभार मानणें मी आपलें कर्तव्य समजतों.

सहृदय वाचकांनां प्रार्थना इतकीच कीं, मजसारख्या विद्याव्यासंग बेताचा असलेल्या सामान्य मनुष्याच्या कृतीकडे सप्रेम अवलोकन केल्यास माझ्या वेड्या मनाला आनंद वाटेल व मजजवळ तयार असलेलीं काव्यें प्रकाशांत आणण्यास उमेद येईल.

नासिक  
ता. १४ जुलै १९१८.

आपला नम्र,  
**विश्वनाथ नारायण वाड.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | श्री गुरु वंदन. .... .... .... | १ |
| २ | स्वावलंबन..... .... .... .... | १ |
| ३ | राम महिमा.... .... .... .... | ३ |
| ४ | मनास बोध.... .... .... ... | ५ |
| ५ | सुखाचा शोध .... .... .... | ७ |
| ६ | कवि.... .... .... .... .... | ८ |
| ७ | धन्य श्री छत्रपती .... .... .... | १० |
| ८ | जगांतील विषमता.... .... .... | ११ |
| ९ | कालाचा ओघ. .... .... .... | १२ |
| १० | देवाचीं प्रिय लेकरें.... .... .... | १३ |
| ११ | विद्यार्थी दशेंतील कर्तव्यें .... .... | १४ |
| १२ | दुःखाचा प्रथम परिचय .... .... | १६ |
| १३ | माझी इच्छा.... .... .... .... | १७ |
| १४ | आकाशांत तारका पाहून .... .... | १८ |
| १५ | ईशस्वरूप.... .... .... .... | २० |
| १६ | पार्थ प्रोत्साहन .... .... .... | २१ |
| १७ | अवधूत प्रार्थना .... .... .... | २१ |
| १८ | जगदंबेस .... .... .... .... | २२ |

१९ आरती जगदंबेची.... .... .... २२
२० राष्ट्रगीत.... .... .... २३
२१ सूज्ञास प्रार्थना. .... .... .... २४

# काव्य कुसुमोद्यान

ठाणे.
9562

## प्रथम गुच्छ.

### श्री गुरु वंदन.

( चालः—साध्य नसे मुनि कन्या. )

श्री गुरु वंदन तुजला । करितो दावी आत्मपदाला ॥
चालः—या मोहानें मायाजालीं ।
मी सांपडलों, व्हावें वाली ।
कोण तुझ्याविण संकट कालीं ।
दीना उद्धरण्याला । विसरुनि माझ्या पापमतीला ॥ १ ॥

### स्वावलंबन.

( दिंडया )

एक दिवशीं जाहलो खिन्न चित्त ॥
मित्र मिळण्याला होय बहु श्रांत ॥

निर्धनाला कोठोनि मान देती ? ॥
भाग्यवंताचे सकल दास होती ॥ १ ॥
व्यर्थ बडबड करुनिया फार गेले ॥
' खार पदराला तो नको ' ह्मणाले ॥
स्वार्थ त्यांचा पाहुनी दुःख होय ॥
स्वावलंबन हीथोर जगीं माय ! ॥ २ ॥
सर्वदा मजला साह्य करी फार ॥
सदुपदेशानें सौख्य दे अपार ॥
दुजावरती भरिभार टाकणें हें ॥
वालुकेवरि मंदीर वाटताहे ! ॥ ३ ॥
भाग्य माझें निद्रेंत जरी घोर ॥
प्रयत्नानें नष्ट हो अंधकार ॥
सौख्य-किरणें दिसतात मला आतां ॥
स्वावलंबन तत्वास मनीं घेतां ! ॥ ४ ॥
धनिक होउनि ये भाग्य काल जेव्हां ॥
मित्र पूर्वींचे प्राप्त होति तेव्हां ॥
गर्व चित्तांतिल सोडुनि तदा ते ॥
प्रेम दाविति वरपांगि, दुःख होतें ! ॥ ५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

मित्रांनीं न फसे कदां कपटि ह्या संभाषणांनीं अता ।

' आहे शीत तिथें भुतें जमति हें ' मी जाणिलें तत्वता ॥
जो अन्यावरि ठेउनी बहुपरी विश्वास ह्या भूवरी ।
चाले; तो नर एकटा पडतसें जाऊनि दुःखोदरीं ॥ ६ ॥

( साक्या. )

स्वतःवरी विश्वास असावा कार्य करी निष्टेनें ॥
प्रभुपद पद्मीं भक्ति दाउनी मोदयुक्त चित्तानें ॥ ७ ॥
परोपकारीं झिजो देह तव वाणी मनही तैसें ॥
अपयश, चिंता दुःख कुठुनि त्या जो प्रभु होउनि बैसे ॥ ८॥

---

## राममहिमा.

( उपजाति )

रामा दयाळा प्रभु विश्वपाळा ।
भक्तीमुळें अर्पिन काव्य माळा ॥
स्वीकार तीचा प्रभुजी करावा ।
नारायणाचा सुत उद्धरावा ॥ १ ॥
आहे तुझें पावन वृत्त फार ।

वर्णावया शक्ति कुठे अपार ? ॥
यथामती जी करितो सुसेवा ।
स्वीकारुनी दीन ऋणी करावा ॥ २ ॥
सापत्न माता जननी परी जो ।
लेखी तयाचें यश कां न गाजो ॥
प्रत्यक्ष वैभव मिळें परि त्यास सोडी ।
श्रीराम येणें शुभ नाम जोडी ॥ ३ ॥
आहे अती दुष्कर तें करीतो ।
वनवास श्रीराम सुखें वरीत्तो ॥
येई गुणाची शुभ रम्य मूर्ती ।
करूं नये कां त्रिजगांत आर्ती ॥ ४ ॥
पत्नीवरी प्रेम दिसें जयाचें ।
सापत्न बंधूवरि तेंवि साचें ॥
लोकाग्रणी कां न अह्मी ह्मणावें ।
देवापरी पूज्य तयां गणावें ॥ ५ ॥
ऐसा अयोध्याधिपती सुरेख ।
झाला पहा राघव एक देख ॥
त्यांचें चरित्रीं बहु बोध आहे ।
वर्णावया शक्त कवी न राहे ॥ ६ ॥

२२८

# मनास बोध.

( भुजंगप्रयात )

मना! श्री हरी सर्वदा आठवावा ।
गुणांचा निधी अंतरीं सांठवावा ।।
विकल्पास चित्तांत द्यावें न स्थान ;
रिपू सर्व ते सोड दंभाभिमान ।। १ ।।
तनू दो दिसांची असे मानवाची ।
मना ! जाणुनि मौर्ख्य पाढा न वाची ।।
सदा सत्कृतीनें जनांलागि सेवी ।
मरें मागुती किर्ति वित्तास ठेवी ।। २ ।।
नरांचा असे सर्व स्वार्थ प्रयत्न ।
तयां कारणें खर्चिती युक्तिरत्न ।।
परी अनुभवा पूर्ण नैराश्य येतां ।
मना! ईश्वरा वांचुनीं कोण त्राता ।। ३ ।।
मना! अर्जुनाचा सखा काय सांगें ।
फलासक्ति वांचोनि कर्मास लागें ।।
परी स्वार्थ हेतू करोनी प्रधान ।
ह्मणे लोक त्याला जगाचा धुरीण ।। ४ ।।

जयें खोदिली खोल गर्ता परार्थ ।
मना! तीमधें तो पडे देख व्यर्थ ॥
ह्मणोनी सख्या परहिता साध कांहीं ।
तुला त्याविना शांतिला स्थान नाहीं ॥ ५ ॥
तुवां दान द्यावें दुजा मानवास ।
नको अंतरीं षड्रिपूंचा निवास ॥
जगीं पेरणें सत्कृतीरूप बीज ।
तया सम्पदा सत्य मानोनि नीज ॥ ६ ॥
नसे वस्ति येथील फारा दिसांची ।
ह्मणोनी तुला संधि दावीन साची ॥
असें सांगणें हा अहंकार सोडी ।
सुखें आयु नें शेंवटीं देव जोडी ॥ ७ ॥
कवीला हवा हा खटाटोप कोठे ? ।
जनांचें न त्या देखवें दुःख मोठें ॥
हितासाठि त्यांच्या सुबोधास देई ।
भुजंगप्रयातीं स्व काव्यास गाई ॥ ८ ॥

ठाणे.

# सुखाचा शोध.

( शार्दूलविक्रीडित. )

आहे सौख्य खरें कशांत न कळें हो भ्रांत मी अंतरीं ।
वाहे काव्य विचाररूप सरिता शोधी तिला मी जरी ॥
मानूं सौख्य वसें धनांत मग तें कां प्राप्त होना मला ।
सूज्ञा सांग वनांत तें वसतसें वाटें तुला प्रेमला ॥ १ ॥
कोणी ह्या कविला जनांत वसतें तें सौख्य ऐसें वदें ।
शोधी तेथहि तत्वत: कवि परी तें त्या न कोणीच दे ॥
अंतीं फार विचार श्रांत बनतां उद्विग्न होई कवी ।
निद्रेच्या वश जाहला प्रभु तया, स्वप्नांत हें ऐकवी ॥२॥
' प्रियबाळा करि ह्यापुढें न कधिही चित्तांत या गोंधळ ।
ठेवी स्वास्थ्य मनास तुष्ट मग हो सत्सौख्य तें केवळ ॥
ऐसें भाग्यवशें जयास मिळतें कोठोनि त्या काळजी ।
शान्ती मी दिधली तुला करिल तो साक्षातही काळ, जी ।३।
बाळा ह्या पुढती न ठेव हृदयीं तू दुष्ट व्यामोह हा ।
नांदे सौख्य 'धनीं' 'वनीं' नच 'जनीं' आहे 'मनीं' तें पहा'
ऐसें बोलत बोलतां न दिसली मूर्ती पुन्हा साजिरी ।
अंतर्धानचि पावली ह्मणुनिया मद्वृत्ति हो लाजिरी ॥ ४ ॥

( साकी. )

कविचित्ता या पुढती दिसला सत्यमार्ग सौख्याचा ॥
मनीं तुष्टता ठेउनि लावी परोपकारीं वाचा ॥ ५ ॥

## कवि.

( गाणें. )

बंधन नाहीं आम्हांला । कवि हृदया रोधायाला ॥
भेद नको ह्या जगतांचे । वर्ण धर्म आचारांचे ॥
प्रतिभेची आम्हीं बाळें । रुचति तिला ते करुं चाळे ॥
कोणा भाट म्हणे कोणी । शाहिर म्हणुनी वाखाणी ॥
निरक्षरा स्त्री रचि गाणें । अकाव्य ऐसें कोण म्हणे ॥
लीला ही कवि हृदयाची । अरासिकां न समज साची ॥
कविला शिक्षण नको मुळी । स्फूर्ती त्याला सांभाळी ॥
जगताची परवा करणें । हें कविला वाटे मरणें ॥
खुशामतीचें काम नसें । स्वेच्छाचारें कवि हांसें ॥
राजा रंक समान जया । न मूर्ख शहाणा भेद तया ॥
रुढि शस्त्रांची किंमत ती । कवि कोठुनि मानीं चित्तीं ॥
कृत्रिमतेचा वाराही । साह्य न; कवि स्वेच्छें राही ॥

ईशाचें यश पसरावें । हें एकाचि कविला ठावें ॥
जन सन्मार्गीं लावावें । ह्मणुनि गान [ काव्य ] कविनें गावें ॥
वाचक रसिक असे कोणी । लागे तोच कवि स्मरणीं ॥
आजवरी किति कवि झाले । माप जगाला नच कळलें ॥
रानांतील फुलें जैशीं । सुगंध पसरिति वनदेशी ॥
लोकांपासुनी दूर परी । कार्य करुनि मग जाय घरीं ॥
असे जाहले कवी किती । वर्णानिं चाले केवि मती ॥
मी त्यांच्या पायाचाही । किंकर शोभे नच पाहीं ॥
परी गातसें प्रभु नाम । बोध सुधा ती निष्काम ॥
विनंति ऐशी जगताला । स्वैर त्यजा कवि रायाला ॥
जगतीचीं दृश्यें सकल । दावि कल्पना तद्विमल ॥
राजांचें वैभव सकल । विदित असें कविला अखिल ॥
गरिबांच्याही उटजांत । गुज गोष्टी करि कवि चित्त ॥
केव्हां रमवी सृष्टि सती । सौंदर्या दावोनि अती ॥
पक्षीं करिती गान कसें । होउनि कवि बे-भान बसे ॥
सरिता गाती मृदु नादें । कवि तेव्हां हर्षे नांदे ॥
कांचन ही किंमत जगता । प्रतिभा करि कविला जगतां ॥
स्वतः स्वतःला विसर पडे । जन म्हणते कविला वेडे ॥
किंमत त्यांची समजेना । छळूं नये हो तरि त्यांनां ॥
भेद जगाचे सामान्य । कवि सृष्टीचे परि अन्य ॥

दोष त्यजावें गुण ध्यावें । काव्य कवीचें सेवावें ॥
उच्च भावना वाढावी परोपकारीं मति लावी ॥
नारायण-सुत सांगतसें कवि विषयीं गाणें ऐसें ॥

## धन्य श्री छत्रपती

( आर्या. )

वंदन सद्भावानें करितो श्री शुभ शिवाजि भूपातें ॥
गो-ब्राह्मण प्रतिपालक; हरिलें जेणें अविंध तापातें ॥१॥
श्री जगदंबा चरणीं भक्तीनें वाहिली जयें काया ॥
परहित तत्पर ऐसा न देखिला अजवरी दुजा राया ॥२॥
लावण्यवती बघतां नर चित्तीं येत खचित चंचलता ॥
शिवबांनीं दावियला जनतेला उलट दाखला पुरता ॥३॥
प्रत्यक्ष सभेमांजी सरदाराच्या धरूनि दारेस ॥
सेवक सभेंत अणितां नरवर तो भूप बोलला तीस ॥४॥
" असती माझी माता तुजसम सौंदर्ययुक्त धन्या ती ॥
लावण्यरूप असलें दिसतें देहांत माझिया सुमती ॥५॥
धीर धरावा भीती सोडावी स्वस्थ राहणें येथें ॥
सन्मानें वागवुनी धाडिन तंव सुगृहां यवन दुहिते ॥६॥

आम्हां आर्य जनांना परकांता वाटते जशी जननी ॥
कन्या किंवा भगिनी तूं माझी मजसि वाटसी स्वमनीं ॥७॥
धर्मानें नीतीनें राज्य करावें अशी भली वाट ॥
मन्मानस सोडींना ह्मणुनि चालतो सुराज्यमय शकट" ।८।
वस्त्राभरणें देउनि त्या स्त्रीला भूप तेधवां बोलें ॥
स्वगृहां जाशी तेथुनि स्वास्थाचा दे निरोप द्रुत बाले।९।
श्रीशिव भूपाची मी कैशी महती यथार्थ सांगावी ॥
घ्यावा बोध सुजनहो ! तव चित्तीं तीच गोष्ट वागावी ।१०।

---

# जगांतील विषमता.

विषमता जगतीं । उपजवी कवि मनीं भीती ॥
**चालः**—कृपासागरा जगदाधारा ।
भक्त श्रेष्ठांच्या माहेरा ॥
विविध दुष्ट दानव संहारा ।
वितरि ज्ञाणि शांती । उपजवी० ॥ १ ॥
वैभव कोठें कोठें दिसलें ।
दुजा स्थळीं दारिद्र्य प्रगटलें ॥
वैचित्र्यानें जग तूं भरिलें ।

अशी तंव [ कां ] रीती । उपजवी० ।। २ ।।
एक भोगितो गाद्या गिरद्या ।
दुज्या दुजाला मिळति न चिंध्या ।।
पुत्रवती कुणी; दुसरी वंध्या ।
हीच ना नीती ।। उपजवी० ।। ३ ।।
अपराधांनां विसरुनि देवा ।
घ्यावी कविची मंगल सेवा ।।
निशिदिनि दीनोद्धार करावा ।
हीच विनंती ।। उपजवी कवि मनीं भीती ।।४।।

---

# कालाचा ओघ.

( भुजंगप्रयात )

गती सूक्ष्म वाटे कवीला नदीची ।
सुखानें परी सागरा भेटण्याची ।।
जसें स्वप्न तात्काल जातें लयाला ।
नरा काल संपेल देई भयाला ।। १ ।।
पहा पुष्प हें मोहवी अल्पकाल ।
यदा नष्ट हो काय सांगे निकाल ।।

बहु सुंदरा स्त्री परी काल जातां ।
कशी रुक्षता ये तिला जाण ताता ॥ २ ॥
प्रभूनें जरी आयु थोडें दिलें कीं ।
धरी नम्रता शांतिनें वाग लोकीं ॥
समाधान हा थोर ठेवा मिळावा ।
तदा काल तो ओघ कैसा कळावा ॥ ३ ॥

## देवाचीं प्रिय लेकरें.

कां जाति मत्सरा वाढवितां अपसांत ;
देवाचीं प्रिय लेकरें सकल आहांत ॥
स्वाभाविक भेदा स्थान न अपुलें अंगीं ।
कटु कृत्रिमतेनें बनला चंगी-भंगी ॥
हा हिंदू ऐसा शिक्का देइ न देव ।
पारशी यवन हें न दिसें भालीं नांव ॥
चालः—प्रेम ही चीज सर्वांत आढळे ।
गुणरूप जगाचें ठायीं सम मिळे ॥
कुतुहल देवाचें देखा आगळें ।
मग व्यर्थ श्रमावें योग्य हीच कां रीत ॥ कां जाति. ॥ १ ॥

हिंद भू माय सर्वांची ती असे ।
तद्धित सूज्ञांनो साधावें कसे ॥
भेद दंभ यांचें मोडावें पिसें ।
रात्रंदिन झटणें दानत वाढविण्यांत ॥ कां जाति ॥ २ ॥
शिक्षणें होउ संपन्न या चला ।
शैथिल्या सोडा आधी निष्फला ॥
भाग्य दिवस देवा दावी चांगला ।
नारायण-सुत तत् इच्छा हीच जगांत ॥ कां जाति० ॥३

# विद्यार्थी दशेंतील कर्तव्यें.

( साक्या )

बोधाचे मी शद्ब कथितसे आज एवढे चार ॥
वर्तन करुनी यश मिळवावें ठेवा हाच विचार ॥ १ ॥
अल्प नराचें आयु जगीं ह्या खरी गोष्ट जरि असली ॥
शक्त्यनुसारें यत्न करी त्या अन्य काळजी कसली ॥ २ ॥
देव दयेचा सागर ह्मणुनी देइन खाटे वरती ॥
यत्न करावा सृष्टि तयास्तव खाली तैशी वरती ॥ ३ ॥
बालांचें मज दिसतें पहिलें आज्ञापालन काम ॥

नं.

कष्टानंतर विश्रांती हा सकल जगाचा नेम ॥ ४ ॥
शरीर अपुलें स्वच्छ असावें पावन मनही तैसें ॥
ह्या दोहींचा संगम तेथें साक्षात् भगवन् निवसे ॥ ५ ॥
गुरुजन अपुले कथिती तेंतें लक्ष लावुनी ऐका ॥
आळस सोडा अहंकार रिपु समूळ शिशुनों टाका ॥ ६ ॥
शिक्षक क्रोधें बोलें तरि तंव हित परिणामीं त्यांत ।
रोष नसावा सहनशीलता ठेवा निज हृदयांत ॥ ७ ॥
अनुभवाविना ज्ञान पुस्तकीं फुकट असें जागिं सत्य ॥
सम्पादावें प्रथम मुलानें समजुनि परि सत्कृत्य ॥ ८ ॥
परस्परांवरि प्रेम असावें कांहीं मित्र मिळावें ॥
विषम काल येतां सम्बंधीं पळतिल करुनी कावे ॥ ९ ॥
नियमित कार्यें सदा करावी मोठे व्हाल तयानें ॥
थेंब थेंब साचतां हो ' तळें ' सांगितलें प्रज्ञानें ॥ १० ॥
शाळेचा अभिमान धरावा जेथें ज्ञान मिळालें ॥
शिक्षक वृन्दीं प्रेम दाखवा व्यर्थ तयांविण सगळें ॥ ११ ॥
राजकारणा योग्य नसें वय, विचार मुळि न करावा ॥
प्राप्त असें कर्तव्य करोनी सत् कित्ता गिरवावा ॥ १२ ॥
बुद्धी कोमल जेव्हां तुमची गहन विचार कशाला ॥
विविध तऱ्हेच्या शिक्षण दानीं सृष्टी फार विशाला ॥ १३ ॥
सम्मेलन कां भरवावें प्रतिवर्षीं प्रिय छात्रांनीं ॥
सहकारित्वें कार्य कराया मंगल संधि तयांनीं ॥ १४ ॥

प्रस्तुत तैसें माजी जमती शिक्षक विद्यार्थी हे ॥
आनंदानें भेटनि जेव्हां पवित्र दिन तो पाहे ॥१५॥
विचार ऐसे अनेक असती सर्व कसे सांगावें ॥
सुचेल तैसें प्रत्येकानें योग्य प्रसंगीं गावें ॥ १६ ॥
घेतो आतां रजा आपुली अप्रिय कांहिं न वदला ॥
प्रेम करा कविवरी तरी मग रक्षिल प्रभु सर्वांला ॥१७॥

---

# दुःखाचा प्रथम परिचय.

[ आंग्ल कवयित्री मिसेस हेमन्स ह्यांच्या First Grief ह्या काव्याच्या आधारें ]

पद ( चालः—नृप ममता रामा वरती. )

भाऊ मम कोठें गेला ? । खेळास उशिर बहु झाला । हे आई ॥ त्यावीण मजा न आह्माला । ऋतु वसंत सुखकर आला ॥ चाल ॥ उभयता । उपवनीं स्वता । वृक्षसम लता । लावुनी सकला मोद दिला केंवि तुह्माला । प्रिय बाळा खेळ सुखानें । दुःख वदू केंवि मुखानें ॥राजसा॥ सुरपुरा । बंधु तव खरा । तूं करी त्वरा । खेळ खेळाया । स्मृति नको तयाची सखया ॥ लाडक्या ॥

9562

( शार्दूलविक्रीडित. )

नाहीं कां जननी इथें पुनरपी येणार भाऊ अतां ।
बागेंतील फुलें फळें सुबकशीं ह्या पाखरांना स्वता ॥
सोडोनी गमलें जया सुख तयांपाशीं न मी बोलत ।
ज्या देवें हरिलें तयाप्रति अतां हा चालला धांवत ॥१॥
बंधू जो प्रिय त्या कशास्तव त्वरें नेशी प्रभो स्वगृहा ।
खेळूं दे मजला तयांसह सुखें ही सोड देवा स्पृहा ॥
वाटें नायकतोंसि ही विनवणी मत्‌चित्त हो घाबरें ।
असतें प्रेम तयावरी बहुत मी केलें तरी तें बरें ॥ २ ॥

---

## माझी इच्छा.

पद. ( चालः — सगुण गुण माया )

घोट ज्ञानाचे । घ्यावेसें गमती साचे ।
**चालः**—नको मुळी संबंध जगाचा ।
दुर्गुण मत्सर द्वेषादींचा ॥
दुःशद्बें न विटाळो वाचा ।
दिसो भाग्याचे । दिन मजला फार सुखाचे ॥ १ ॥

कनक कामिनी ह्यांचे करितां ।
वाहे दुर्धर शोणित सरितां ॥
दुर्गुण माझ्या मधले सरतां ।
कुठुनि द्वंद्वाचें । कारण मग तें उरण्याचें ॥ २ ॥

प्रेमामृत प्राशुनिया मजला ।
दिसेल जग पुष्पांचा झेला ॥
सौगंधानें पूरित झाला ।
दुर्गुणादीचें । मिळतें न स्थान नांवाचें ॥ ३ ॥

विद्या-रवि सुखकर किरणांहीं ॥
प्रकाश हृदयांकाशीं देई ।
कुठुनि तमाचें कारण राही ॥
दिवस भाग्याचे । दिसतां कवि हर्षें नाचें ॥ ४ ॥

---

## आकाशांत तारका पाहून.

नभीं तारका किति दिसती ।
कोण करी त्यांची गणती ! ॥
रत्नें त्यानां कुणि समजें ।
विचित्र शोभा पहा मजें ॥

नं. ठाणे.

पुष्पें दिसतीं कां सारीं ? ।
अथवा कमलें कासारीं ! ॥
कथिती ज्योतिर्विद् लोकां ।
दुजीं जगें हीं अवलोका ॥
शास्ता यांचा कुठें बसे ? ।
भूल पाडितो होय कसें ॥
बुद्धीची धांव न चाले ।
नियमानें जग बांधियलें ॥
प्रतिभेचीं आह्मीं बाळें ! ।
प्रभू दावितो आत्मबळें ॥
ह्मणुनी त्याला नती करी ।
निष्ठा ठेवी तयांवरी ॥
कृत्यें त्याचीं निरखावीं ।
वृत्ती सन्मार्गीं लावी ॥
अहंकृतीला स्थान नको ।
संशय मन सगळे टाको ॥
देवा ज्ञानशलाकांहीं ।
पाजळि स्वजन-मनें कांहीं ॥
कविची आशा पुरवावी ।
दृश्यें जगतां ह्या दावीं ! ॥

# ईश स्वरूप.

रूप ईशाचें । ना कळें जगाला साचें ।

**चालः**—हिन्दूनां तो कृष्ण दिसावा ।
ख्रिस्तानां ख्राइस्ट दिसावा ॥
महंमदीयां अल्ला व्हावा ॥
अशा देवाचें ; कवि वर्णन करितों त्याचें ॥ १ ॥

यत् चिंतनि वाङ्ग मनही परते ।
उत्कंठा परि मनुजा उरते ॥
बुद्धि तयाला प्रेरण करिते ।
म्हणुनि नर त्याचें । शोधनीं मग्न सत्याचें ॥ २ ॥

निराकार निर्गुण प्रभु आहे ।
अपुलें प्रेम सगुण करितांहे ॥
' अका ' ' वारी ' ' वॉटर ' ' जल ' हे ।
भेद नामाचे । वचन ' श्री रामकृष्णाचें ' ॥ ३ ॥

# पार्थ प्रोत्साहन.

पद ( चालः—( सुलभमनि गणा )

[ भगवद्गीताः—अ० २, श्लोक २--३. ]

अयोग्य हें तुजला । अर्जुना ! । क्लैब्योद्भव हा कोठुनि झाला ॥ अयोग्य. ॥ १ ॥ अनार्य ऐसा अयशस्करसा । विचार मनिं आला । अयोग्य. ॥ २ ॥ दुर्बल हृदयां । सोडी सखया । दे रिपु तापाला ॥ अयोग्य. ॥ ३ ॥

# अवधूत प्रार्थना.

पद [ चालः --पाण्डु नृपति जनक ]

दिव्य दृष्टि द्या मजला । सिंचावें प्रेम-जला । परमार्थांकुर त्याला । नित्य वाढवा ॥ १ ॥ सद्गुरु श्री अवधूता । येवुनिया द्या हाता । उपदेशामृत आतां । नित्य चाखवा ॥ २ ॥ षड्रिपुचा जाच भला । दुःसह अति होय मला ।

स्वरुप-दीप लाभाला । योग्य मज करा ॥ ३ ॥ स्वामी मी बहुत दीन । निष्ठेनें चरणि लीन । ब्रह्मपदीं मज विलीन । शेंवटीं करा ॥ ४ ॥

## जगदंबेस.

पद ( चालः— जय कृष्णा )

जगदंबे धांव अतां । दूर करी मम चिंता ॥

**चालः** ठाव नसें दुःखाला ।

षड्रींचा ये घाला ।

तारक तूं बुडल्याला ।

वाचवि देवोनि हतां ॥ जगदंबे धांव. ॥ १ ॥

## आरती जगदंबेची.

जयदेवी जयदेवी त्रिभुवन-आनंदे ॥

सकल चराचर तुझिया सत्तेनें नान्दें ! ॥

रवि शशि निर्मुनि आह्मां दीप भले दिधलें ।
तरुवर पर्वत द्विजवर जगता अर्पीलें ॥
सृष्टीचें ह्या सगळ्या चालविसी सूत्र ॥
गावें कां न तुझें हें बहु पावन स्तोत्र ॥१॥ जय देवी.
दीन जनोद्धाराचें काम सदा व्हावें ।
दासाचे ह्या तुझिया हेतू पुरवावें ॥
वाड कुळाचें भूषण नारायण-नामें ।
पुत्र तयाचा तेणें स्तविलें निष्कामें ॥२॥ जय देवी

---

# राष्ट्रगीत.

( चाल बँडची )

हे कृपाळु ईश्वरा । द्या अह्मांस आसरा ॥
जॉर्ज राजया सदा । वितरि आयु सम्पदा ॥
युद्धरूप वन्हि हा । भाजि जन-मना महा ॥
न्याय नीति राखि ती । दोस्त राष्ट्र संहती ॥
शुभ यशास द्या त्वरें । काय मागणें उरें ॥

# सूज्ञास प्रार्थना.

( शार्दूलविक्रीडित )

आहे वाचक जो कुणी रसिक त्या ही शेवटीं प्रार्थना ।
सेवावा गुण लेश, दोष ह्मणुनी व्हावा कधी रोष ना ॥
सांगें जो मजला हितप्रद अशीं संभाषणें वांचुनी ।
त्याचा मी उपकार बद्ध बनुनी ये धन्यता मन्मनीं ॥१॥

REFBK-0001572
REFBK-0001572

समाप्त.

९५६२